सकाळ कुडे पान नं. ९, २४-१-२०२२

। अकोला । सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध

f SakalNews @SakalM

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# प्रजासत्ताक दिन संचलनास 'डीपी'च्या दोघींची निवड

**कोरेगाव, ता. २३ :** दिल्ली येथे प्रजासत्ताकदिनी होणाऱ्या संचलनासाठी येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेनेच्या (एनसीसी) तनुजा शिर्के आणि गौरी खिलारे यांची निवड झाली.

दिल्लीतील संचलनासाठी निवड करण्यासाठी प्रथम स्थलसैनिक कॅम्प आयोजित करण्यात येतो. त्यासाठी महाराष्ट्रातून प्राथमिक स्तरावर २८० विद्यार्थिनींची निवड केली होती. हा सराव कॅम्प होऊन त्यातून दिल्ली येथील संचलनासाठी अंतिमस्तरासाठी ३९ विद्यार्थिनींची निवड झाली. त्यात एकाच वेळी भोसले महाविद्यालयातील ज्युनिअर अंडर ऑफिसर तनुजा शिर्के, गौरी खिलारे यांची निवड झाली. २२, महाराष्ट्र बटालियनचे कर्नल दीपक



तनुजा शिर्के गौरी खिलारे

ठोंगे, कर्नल एम. व्ही. भालसिंग, महाविद्यालयाचे राष्ट्रीय छात्रसेनाप्रमुख कॅप्टन बाळकृष्ण भोसले, मेजर यशवंत घाडगे यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रयतचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, डॉ. विठ्ठल एस. शिवणकर, डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्रा. विजयसिंह सावंत, डॉ. एस. डी. जाधव, एस. एन. कोळेकर, डॉ. बी. एस. लोकडे, दीप्ती जगदाळे व सहकाऱ्यांनी दोघींचे अभिनंदन केले.